ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, ४ सप्टेंबर, १९६३ | अंक १७

## विविध माहिती

**हिंदी मालाची रशिआकडून मागणी**—मॉस्कोमध्यें भरविण्यांत आलेल्या हिंदी मालाच्या प्रदर्शनांत तें सुरू झाल्यापासून १५ दिवसांच्या अवधींत ११ कोटी रुपयांच्या मालाची मागणी रशिआकडून करण्यांत आली. हें प्रदर्शन १५ ते २० हजारांवर लोकांनीं पाहिलें असावें. प्रदर्शनासाठीं भारतामधील १८५उद्योगपती मॉस्कोला गेले होते. प्रदर्शनाचा एक अनुबोधपट हिंदी तंत्रज्ञ तयार करीत आहेत. त्याची लांबी २ हजार फूट असेल. पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट देशांच्या पंतप्रधानांना प्रदर्शन पाहण्यासाठीं आमंत्रण देण्यांत आलें होतें.

**शस्त्रास्त्रांची गल्लत होणार नाहीं**—चीनच्या संभाव्य हवाई हल्ल्यामुळें भारताचे हवाई दल नोव्हेंबरच्या सुमारास ब्रिटन, अमेरिका व ऑस्ट्रेलिआ ह्यांच्या हवाई दलाशीं सहकार्य करून कवाइत करणार आहे. ह्या कवाइतीच्या प्रसंगानें अमेरिकेकडून मिळणाऱ्या शस्त्रास्त्रांची इतर देशांच्या शस्त्रास्त्रांशीं गल्लत होण्याची भीति व्यक्त करण्यांत आली होती. परंतु अशी गल्लत होऊं न देण्याची खबरदारी घेणें भारताच्या हातीं आहे. रशिआकडून मिळणाऱ्या लष्करी साहित्याबद्दल ही भीति विशेषतः व्यक्त झाली होती.

**पॉवर अल्कोहलचे कारखाने**—उत्तरप्रदेशांत पॉवर अल्कोहल निर्माण करणारे १७ कारखाने आहेत. ह्या कारखान्यांचा विस्तार करण्याची योजना उत्तर प्रदेश सरकारनें तयार केली आहे. विस्ताराच्या कार्यक्रमासाठीं २१ लाख रुपये खर्च येणार आहे. उत्तर प्रदेशांत कृत्रिम रबर तयार करण्याचा कारखाना स्थापन झाला असल्यामुळें आतां पॉवर अल्कोहलची मागणी वाढत जाणार आहे.

**भारताच्या भांडवलाला वाव**—इंडोनेशिआंत भारताच्या व इतर देशांच्या भांडवलाला चांगला वाव आहे. अर्थात इंडोनिशिअन भांडवलाशीं सहकार्य करूनच उद्योगधंदे काढता येतील. परंतु कांहीं थोड्या वर्षांतच मूळ भांडवल व नफा परदेशीय चलनाच्या रूपांत स्वदेशी नेतां येईल अशी माहिती जाकार्ता येथील हिंदी व्यापारी प्रतिनिधीनें दिली आहे. इंडोनेशियांत डबाबंद मासे भरण्याचा, खोबऱ्याचें तेल काढण्याचा, इत्यादी कारखाने काढतां येण्यासारखे आहेत.

**कुवेतची भारताला मदत** — खनिज तेलासाठीं प्रसिद्ध असलेल्या कुवेतच्या राज्यानें भारताला ५ कोटी पौंडांची मदत मंजूर केली आहे. भारताच्या परदेशीय व्यवहारखात्याच्या मंत्री श्रीमती लक्ष्मी मेनन त्या राज्यांत गेल्या असतांना कुवेतच्या शेखनें ही मदत जाहीर केली. मदतीचा उपयोग हिंदमधील आर्थिक विकासासाठीं करावयाचा आहे.

**मेक्सिकन गव्हाची लागवड** — कांहीं विशिष्ट जातीच्या मेक्सिकन गव्हाची लागवड करण्याच्या दृष्टीनें त्याचें बियाणें तयार करण्याचा विचार हिंदी शेतकीशास्त्रज्ञ करीत आहेत. ह्या गव्हाची लागवड करून मेक्सिकोनें आपल्या गव्हाच्या उत्पादनांत तिप्पट वाढ केली. आतां त्या देशांतून गहूं निर्यात करण्यांत येतो. गव्हाचीं रोपटीं फारशीं उंच नसतात. ह्या गव्हाचें पीक दर एकरीं १५ ऐवजीं ७५ हेक्टर येऊं शकेल, असें सांगण्यांत येत आहे.

**भाक्रा धरणावरील वीजनिर्मिति**—भाक्रा धरणावर निर्माण करण्यांत येणाऱ्या विजेंत वाढ करण्यांत येणार आहे. धरणाच्या उजव्या किनाऱ्यावर रशियाच्या मदतीनें उभारण्यांत येत असलेल्या वीजनिर्मिति केंद्रांत वीजनिर्मितीचें ५ वें यंत्र बसविण्यांत येत आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें आणखी १२० मेगॅवॅट वीज निर्माण होऊं शकेल. उभारणीच्या कामीं रशियन यंत्रज्ञ राबत आहेत. १९६१ सालीं रशिआनें भारताला ६० कोटी रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. ह्या कर्जातून यंत्रसामग्रीला लागणाऱ्या खर्चापैकीं परदेशीय चलनाच्या स्वरूपांतील खर्च भागविला जाईल.

**गेंडा नाहींसा होण्याची भीति**—वॉशिंग्टन येथें २ हजार प्राणिशास्त्रज्ञांची परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेला ६२ देशांचे प्रतिनिधी आले होते. गेंडा हा प्राणी पृथ्वीतलावरून नाहींसा होण्याची भीति परिषदेंत व्यक्त करण्यांत आली. ह्या प्राण्याच्या शिंगाचा औषधी उपयोग होत असल्याचें सांगण्यांत येतें. नेपाळ व भारतांत सुमारें ६०० गेंडे आहेत. सुमात्रा, बोर्निओ, इत्यादी ठिकाणींहि कांहीं थोडे आहेत. परंतु शिंगासाठीं त्याची हत्त्या होत असते. ह्या प्राण्यांची वस्ति विरळ असल्यानें त्यांचें जननहि फारसें होत नाहीं.

**औषधी वनस्पतींचें संशोधन**—सोव्हिएट रशियांतील वनस्पतिशास्त्रज्ञ गेलीं कांहीं वर्षें जंगलांत उगवणाऱ्या हजारों औषधी वनस्पतींचें संशोधन करीत आहेत. रशिआ, चीन मंगोलिआ, भारत, अफगाणिस्थान, इराण, इत्यादी देशांत हजारों वर्षें अनेक वनस्पति औषधांसाठीं वापरल्या जातात. ह्या वनस्पतींच्या संशोधनावर विशेष भर देण्यांत येत आहे. खुद्द रशियांत दोन हजार प्रकारच्या औषधी वनस्पति आहेत.

**पाणीपुरवठा व भुयारी गटारांच्या योजना**— आंध्र प्रदेश सरकारनें राज्याच्या स्थानिक स्वराज्य खात्याच्या मंत्र्यांच्या परिषदेंत अशी सूचना केली आहे कीं पाणीपुरवठा व भुयारी गटारें ह्यांच्या योजना पंचवार्षिक कार्यक्रमांतून काढून टाकण्यांत याव्यात. ह्या कामांना लागणारा पैसा आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून कर्जाच्या स्वरूपांत उभा करण्यांत यावा असें राज्यसरकारचें मत आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, ४ सप्टेंबर, १९६३ | अंक १७

## विविध माहिती

**हिंदी मालाची रशिआकडून मागणी**—मॉस्कोमध्यें भरविण्यांत आलेल्या हिंदी मालाच्या प्रदर्शनांत तें सुरू झाल्यापासून १५ दिवसांच्या अवधींत ११ कोटी रुपयांच्या मालाची मागणी रशिआकडून करण्यांत आली. हें प्रदर्शन १५ ते २० हजारांवर लोकांनीं पाहिलें असावें. प्रदर्शनासाठी भारतामधील १८५उद्योगपती मॉस्कोला गेले होते. प्रदर्शनाचा एक अनुबोधपट हिंदी तंत्रज्ञ तयार करीत आहेत. त्याची लांबी २ हजार फूट असेल. पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट देशांच्या पंतप्रधानांना प्रदर्शन पाहण्यासाठी आमंत्रण देण्यांत आलें होतें.

**शस्त्रास्त्रांची गल्लत होणार नाहीं**—चीनिच्या संभाव्य हवाई हल्ल्यामुळें भारताचे हवाई दल नोव्हेंबरच्या सुमारास ब्रिटन, अमेरिका व ऑस्ट्रेलिआ ह्यांच्या हवाई दलाशीं सहकार्य करून कवाइत करणार आहे. ह्या कवाइतीच्या प्रसंगानें अमेरिकेकडून मिळणाऱ्या शस्त्रास्त्रांची इतर देशांच्या शस्त्रास्त्रांशीं गल्लत होण्याची भीति व्यक्त करण्यांत आली होती. परंतु अशी गल्लत होऊ न देण्याची खबरदारी घेणें भारताच्या हातीं आहे. रशिआकडून मिळणाऱ्या लष्करी साहित्याबद्दल ही भीति विशेषतः व्यक्त झाली होती.

**पॉवर अल्कोहलचे कारखाने**—उत्तरप्रदेशांत पॉवर अल्कोहल निर्माण करणारे १७ कारखाने आहेत. ह्या कारखान्यांचा विस्तार करण्याची योजना उत्तर प्रदेश सरकारनें तयार केली आहे. विस्ताराच्या कार्यक्रमासाठी २१ लाख रुपये खर्च येणार आहे. उत्तर प्रदेशांत कृत्रिम रबर तयार करण्याचा कारखाना स्थापन झाला असल्यामुळें आतां पॉवर अल्कोहलची मागणी वाढत जाणार आहे.

**भारताच्या भांडवलाला वाव**—इंडोनेशिआंत भारताच्या व इतर देशांच्या भांडवलाला चांगला वाव आहे. अर्थात इंडोनिशिअन भांडवलाशीं सहकार्य करूनच उद्योगधंदे काढता येतील. परंतु कांहीं थोड्या वर्षांतच मूळ भांडवल व नफा परदेशीय चलनाच्या रूपांत स्वदेशी नेतां येईल अशी माहिती जाकार्ता येथील हिंदी व्यापारी प्रतिनिधीनें दिली आहे. इंडोनेशियांत डबाबंद मासे भरण्याचा, खोबऱ्याचें तेल काढण्याचा, इत्यादी कारखाने काढतां येण्यासारखे आहेत.

**कुवेतची भारताला मदत** — खनिज तेलासाठी प्रसिद्ध असलेल्या कुवेतच्या राज्यानें भारताला ५ कोटी पौंडांची मदत मंजूर केली आहे. भारताच्या परदेशीय व्यवहारखात्याच्या मंत्री श्रीमती लक्ष्मी मेनन त्या राज्यांत गेल्या असतांना कुवतेच्या शेखनें ही मदत जाहीर केली. मदतीचा उपयोग हिंदमधील आर्थिक विकासासाठी करावयाचा आहे.

**मेक्सिकन गव्हाची लागवड** — कांहीं विशिष्ट जातीच्या मेक्सिकन गव्हाची लागवड करण्याच्या दृष्टीनें त्याचें बियाणें तयार करण्याचा विचार हिंदी शेतकीशास्त्रज्ञ करीत आहेत. ह्या गव्हाची लागवड करून मेक्सिकोनें आपल्या गव्हाच्या उत्पादनांत तिप्पट वाढ केली. आतां त्या देशांतून गहूं निर्यात करण्यांत येतो. गव्हाचीं रोपटीं फारशी उंच नसतात. ह्या गव्हाचें पीक दर एकरीं १५ ऐवजीं ७५ हेक्टर येऊं शकेल, असें सांगण्यांत येत आहे.

**भाक्रा धरणावरील वीजनिर्मिति**—भाक्रा धरणावर निर्माण करण्यांत येणाऱ्या विजेंत वाढ करण्यांत येणार आहे. धरणाच्या उजव्या किनाऱ्यावर रशियाच्या मदतीनें उभारण्यांत येत असलेल्या वीजनिर्मिति केंद्रांत वीजनिर्मितीचें ५ वें यंत्र बसविण्यांत येत आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें आणखी १२० मेगॅवॅट वीज निर्माण होऊं शकेल. उभारणीच्या कामीं रशियन यंत्रज्ञ राबत आहेत. १९६१ सालीं रशिआनें भारताला ६० कोटी रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. ह्या कर्जातून यंत्रसामग्रीला लागणाऱ्या खर्चापैकी परदेशीय चलनाच्या स्वरूपांतील खर्च भागविला जाईल.

**गेंडा नाहींसा होण्याची भीति**—वॉशिंग्टन येथें २ हजार प्राणिशास्त्रज्ञांची परिषद भरविण्यांत आली होती. परिषदेला ६२ देशांचे प्रतिनिधी आले होते. गेंडा हा प्राणी पृथ्वीतलावरून नाहींसा होण्याची भीति परिषदेंत व्यक्त करण्यांत आली. ह्या प्राण्याच्या शिंगाचा औषधी उपयोग होत असल्याचें सांगण्यांत येतें. नेपाळ व भारतांत सुमारें ६०० गेंडे आहेत. सुमात्रा, बोर्निओ, इत्यादी ठिकाणींहि कांहीं थोडे आहेत. परंतु शिंगासाठी त्याची हत्त्या होत असते. ह्या प्राण्यांची वस्ति विरळ असल्यानें त्यांचें जननहि फारसें होत नाहीं.

**औषधी वनस्पतींचें संशोधन**—सोव्हिएट रशियांतील वनस्पतिशास्त्रज्ञ गेलीं कांहीं वर्षें जंगलांत उगवणाऱ्या हजारों औषधी वनस्पतींचें संशोधन करीत आहेत. रशिआ, चीन मंगोलिआ, भारत, अफगाणिस्थान, इराण, इत्यादी देशांत हजारों वर्षें अनेक वनस्पति औषधांसाठी वापरल्या जातात. ह्या वनस्पतींच्या संशोधनावर विशेष भर देण्यांत येत आहे. खुद्द रशियांत दोन हजार प्रकारच्या औषधी वनस्पति आहेत.

**पाणीपुरवठा व भुयारी गटारांच्या योजना**— आंध्र प्रदेश सरकारनें राज्याच्या स्थानिक स्वराज्य खात्याच्या मंत्र्यांच्या परिषदेंत अशी सूचना केली आहे कीं पाणीपुरवठा व भुयारी गटारें ह्यांच्या योजना पंचवार्षिक कार्यक्रमांतून काढून टाकण्यांत याव्यात. ह्या कामांना लागणारा पैसा आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून कर्जाच्या स्वरूपांत उभा करण्यांत यावा असें राज्यसरकारचें मत आहे.

### अभ्रकाच्या खाणींचा धंदा संकटांत

अभ्रकनिर्यातवाढ मंडळाची वार्षिक सभा कलकत्ता येथें मंडळाचे अध्यक्ष श्री. एस. के. सेन ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं भरली होती. सभेंत बोलतांना श्री. सेन ह्यांनीं अभ्रकाच्या खाणींचा धंदा अडचणीच्या परिस्थितीला तोंड देत असल्याचें सांगितलें. ते म्हणाले कीं, देशांतल्या अभ्रकाच्या खाणींपैकी ३० टक्के खाणी बंद करण्यांत आल्या आहेत. अभ्रकाला येणाऱ्या किंमती पड आहेत आणि अशा परिस्थितींत खाणी चालविणें आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखें नाहीं. अभ्रकाचा व्यापार करणाऱ्या २८ टक्के व्यापाऱ्यांना आपला धंदा बंद करावा लागला आहे. कारण, विकल्या गेलेल्या मालाचे पैसे त्यांना वेळेवर मिळत नाहींत. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार खात्यानें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालांत अभ्रकाच्या धंद्याविषयींच्या अडचणींच्या परिस्थितीचें दिग्दर्शन केलेलें आहे. अहवालावरून असें दिसून येतें कीं, भारताकडून होणाऱ्या कच्च्या अभ्रकाची निर्यात कमी होत चाललेली आहे. १९६०-६१ सालीं भारतानें पश्चिम जर्मनीला ११९ लाख रुपये किंमतीचें अभ्रक निर्यात केलें होतें. हीच निर्यात १९६१–६२ सालीं ९७ लाखांपर्यंत आणि १९६२-६३ सालीं ७० लाखांपर्यंत खालीं आलेली आढळून आली. पश्चिम जर्मनीनें अभ्रकाची गरज दुसऱ्या कृत्रिम पदार्थाच्या वापरानें भागविण्यास प्रारंभ केल्यामुळें निर्यातींत ही घट झालेली आहे. इटली व फ्रान्स ह्यांच्याकडे निर्यात करण्यांत येणाऱ्या अभ्रकांतहि अशीच घट झालेली आहे. अभ्रकाच्या निर्यातीसाठीं किमान किंमत ठरविण्यासाठीं आणि अभ्रकाचा दर्जा राखण्यासाठीं काय करतां येईल हें पाहण्याचा सरकारचा विचार आहे. सरकारनें ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे. कमिटीवर अभ्रकाच्या खाणींच्या मालकांचे प्रतिनिधि घेण्यांत आले आहेत. पश्चिम युरोपांत अभ्रक वापरणारे उद्योगधंदे जोरानें फोफावत आहेत. परंतु त्यांच्या अभ्रकाच्या मागण्या पुरविण्यासाठीं ह्या खाणींचा धंदा संघटित करण्यांत आला पाहिजे.

### गोव्याहून अशुद्ध लोखंडाची निर्यात

१९६३-६४ सालांत गोव्याहून किमान १० लाख टन अशुद्ध लोखंड निर्यात करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ही निर्यात करतां यावी म्हणून स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें पूर्व युरोपांतील देशांशीं वाटाघाटी कराव्या अशी सूचना देण्यांत आली आहे. गोव्यांतील छोट्या खाणी मालकांनीं मंदींत सांपडल्यामुळें आपल्या खाणी गेल्या कांहीं महिन्यांपासून बंद केलेल्या आहेत. ह्या खाणी चालू करण्याचा सरकारचा इरादा आहे. गोव्यांत २७४ छोट्या खाणी असून त्यांपैकी २६० खाणी बंद करण्यांत आलेल्या आहेत. त्या खाणींतून निघणाऱ्या अशुद्ध लोखंडाला मागणीच येत नव्हती. खाणी बंद करण्यांत आल्यामुळें २० हजार खाणकामगार बेकार झालेले आहेत.

### रेयॉनसाठी लागणारा लगदा

बिर्ला उद्योगगटानें मध्यप्रदेशांतील बस्तार विभागांत रेयॉन तयार करण्यासाठी लागणारा लगदा तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्यासंबंधीची प्राथमिक पाहणी पूर्वीच पूर्ण करण्यांत आली आहे. बस्तार भागांत दाट जंगल असून त्यांत बांबू विपुल प्रमाणांत सांपडतो. बांबूंचा उपयोग लगदा तयार करण्याचा कच्चा माल म्हणून करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं ७ कोटी रुपये भांडवल लागणार असून त्यांत दररोज १५० टन लगदा उत्पादन करण्यांत येईल.

### चित्रपटाच्या धंद्यांतील प्राप्तिकराची वसुली

चित्रपटाच्या धंद्यांत गुंतलेल्या लोकांकडून यावयाच्या प्राप्तिकराची वसुली अधिक चोखपणें करण्यासाठीं मुंबई आणि कलकत्ता शहरांत अधिक विभाग स्थापन करण्यांत आले आहेत. ह्या प्रयत्नामुळे प्राप्तीवरील कर भरण्यास पात्र अशीं अनेक उत्पन्नें उजेडांत आलीं असून त्यांच्यावर दंडादाखल अधिक आकारणीहि करण्यांत आली आहे. १ एप्रिल, १९६२ पासून ३१ मार्च, १९६३ अखेर कर बसविण्यास पात्र असलेलीं पण दडविण्यांत आलेलीं ३,२१२ प्रकरणें उघडकीस आणण्यांत आलीं. हीं प्रकरणें सोडून प्राप्तीवरील करास लायक अशीं आणखी ७५,४४१ प्रकरणें नव्यानें शोधून काढण्यांत आलीं. चित्रपट सृष्टींतील बड्या नटनट्या आपल्या प्राप्तीपैकीं ७५ टक्के प्राप्ति दडवतात अशी माहिती अर्थमंत्र्यांनी मद्रास येथें जाहीर केली होती. ३१ मार्च, १९६३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षांत ७२·१२ कोटी रुपये प्राप्तिकराची थकबाकी वसूल करण्यांत आली.

### कारखाना नीट न चालल्यामुळें नुकसान

रुमेनिआच्या सहकार्यानें काढण्यांत आलेला नूनमती येथील तेलशुद्धीचा कारखाना कांहीं तांत्रिक दोषांमुळें नीट चालू शकला नाहीं. कारखान्यांतील रॉकेल वेगळे काढणारी यंत्रसामग्री बरोबर चालली नाहीं. त्यामुळें व उत्पादनांत खंड आल्यामुळें सुमारें १·८ कोटी रुपयांचें नुकसान झालें आहे. १९६२ च्या एप्रिल महिन्यांत रॉकेल तेलाच्या उत्पादनास प्रारंभ करण्यांत आला. परंतु तेव्हांपासून जुलै १९६३ च्या अखेरीपर्यंत उत्पादन फक्त १३२ दिवसच करण्यांत आलें आणि तेंहि अधूनमधून. त्यामुळें कारखानाहि संपूर्णपणें चालू शकला नाहीं. तो अपेक्षेप्रमाणें चालला असता तर त्यांत दरमहा ६,००० टन चांगल्या प्रतीचे रॉकेल निर्माण होऊ शकले असते. आतांपर्यंत फक्त १४ हजार टन उच्च प्रतीचें रॉकेल निर्माण करण्यांत आले आहे. रॉकेलच्या उत्पादनाबाबत पूर्व युरोपांतील तंत्रज्ञ फारसे जाणकार नसल्यानें त्यांना संबंधित यंत्रसामग्रीची नीटशी कल्पना नव्हती अशी टीका करण्यांत येत आहे.

### भारतामधील क्षयरोगविषयक पाहणी

भारत सरकार आणि राज्य सरकारें मिळून सर्व भारतांत क्षयरोगविरोधी मोहीम चालवीत आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आलेली ही मोहीम पार पाडण्याची जबाबदारी राज्य सरकारांवर आहे, परंतु ती चालविण्यासाठीं मध्यवर्ती सरकारकडून आर्थिक मदत देण्यांत येते. एकदाच येणाऱ्या खर्चापैकी ७५ टक्के व पुन्हां-पुन्हां येणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के खर्च मध्यवर्ती सरकार सोसते. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत क्षयरोगाविषयीं करण्यांत आलेल्या नमुनापहाणींत भारतांत एकूण ५० लाख लोकांना कमी-अधिक प्रमाणांत क्षयाची भावना झाल्याचें आढळून आलें आहे. त्यांपैकी १५ लाख क्षयरोग्यांना झालेला रोग संसर्गजन्य असल्यामुळें त्यांना खास उपायांची जरूरी आहे. क्षयरोगप्रतिबंधक मोहिमेसाठीं चालू कार्यक्रमांत ११·८२ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. क्षयरोग हा मुख्यतः निकस आहारामुळें आणि राहण्याच्या अस्वच्छ जागेमुळें उद्भवतो.

### १ पेनीच्या पोस्टाच्या तिकिटाला दीड लक्ष रुपये

बर्म्युडामध्यें १८५४ मध्यें काढलेलें एक पेनी किमतीचें तिकीट एका इटालियन छांदिकानें १,४६,६३० रुपयांना विकत घेतलें.

# अर्थ

बुधवार, ४ सप्टेंबर, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी खटपट

हिंदमधील साखरेचें उत्पादन वाढविण्याच्या हेतूनें भारत सरकारनें ह्या वर्षीच्या उसाच्या गाळणीचा हंगाम लवकर सुरू करण्याच्या सूचना साखर कारखान्यांना दिल्या आहेत. साखरेच्या उत्पादनांत गेल्या हंगामांत घट झाल्यानें देशांतर्गत खपासाठी व निर्यातीसाठी आवश्यक तितकी साखर मिळूं शकली नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील साखरेचे कारखाने आपला हंगाम ह्या वर्षी ऑक्टोबरच्या मध्यापासून सुरू करतील असा अंदाज आहे. दक्षिण भारतांत उसाचें पीक लवकर पक्व होतें. त्यामुळें तेथील कारखाने पुढील महिन्याच्या प्रारंभीं चालू होण्याची शक्यता आहे. तथापि साखरेच्या उत्पादनाशीं व व्यापाराशीं संबंधित असलेल्या लोकांच्या मतानें साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी सरकारनें योजलेल्या उपायांना म्हणावें तितकें यश येणार नाहीं. उसाचा शेतकरी पीक पक्व झाल्याशिवाय त्याची तोडणी करण्यास तयार होणार नाहीं. अपक्व उसाचें गळीत जरीं सुरू करण्यांत आलें तरी त्यापासून होणारा साखरेचा उतारा कमी असणार आणि त्यामुळें साखरेचें उत्पादनहि कमीच होणार. गेल्या कांहीं वर्षांत पुष्कळशा कारखान्यांना गळितासाठी लागणारा ऊंस पुरेशा प्रमाणांत मिळाला नाहीं. त्याचें कारण असें कीं, उसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत वाजवी प्रमाणांत वाढ झालेली नाहीं. अशा परिस्थितींत साखरेचे कारखाने लवकर सुरू करण्यांत आले तर ते लवकर बंदहि करावे लागण्याचा संभव आहे. उसाचें पीक दीर्घ कालावधीचें असल्यानें त्याची लागवड एकदम वाढवितां येणें शक्य नसतें. त्यांतच लागवडीच्या चालू हंगामांत उसाच्या मळेवाल्यांना पुरेसें बेणें पुरविण्यांत आलें नाहीं, अशा वार्ता आहेत. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करतां तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील साखरेचें दुरुस्त उद्दिष्ट गांठतां येणें अवघड वाटत आहे. हें उद्दिष्ट ३५ लाख टनांऐवजीं ४० लाख करण्यांत आलें आहे.

---

### केळ्यांची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न

निर्यात व्यापार वाढविण्याची भारताची गरज अलीकडे अधिक तीव्र झालेली आहे. कारण आतां नेहमींच्या विकास कार्याबरोबर चिनी आक्रमणामुळें परदेशीय चलनांत कराव्या लागणाऱ्या खर्चांत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे म्हणून अनेक प्रकारच्या नव्या मालाची नवनव्या बाजारपेठांत निर्यात करण्याचे प्रयत्न जारीनें करण्यांत येत आहेत. गेल्या वर्षी रशियाला भारतामधील केळीं निर्माण करण्याच्या दृष्टीनें विचार चालू होता. हिंदमधील केळीं रशिआला निर्यात करण्याच्या मार्गांतील पहिली अडचण म्हणजे हीं केळीं टिकण्याची; पण आतां ही अडचण दूर झाली आहे. केळीं टिकण्यासारखें योग्य तपमान ज्या बोटींत राखतां येईल अशा प्रकारच्या बोटी निर्यातीसाठी वापरण्यांत येणार आहेत. त्यामुळें रशिआनें भारताकडून ४ हजार टन केळीं घेण्याचा करार केला आहे. हिंदी केळ्यांना पश्चिम आशीआंतील कांहीं देशांचीहि चांगली मागणी आहे. कुवेतच्या राज्यांत नुकतीच ५ हजार टन केळीं पाठविण्यांत आलीं. युरोपांतील देशांना हिंदमधील केळीं निर्यात करतां येतील काय हें पाहण्यासाठीं एक प्रतिनिधिमंडळ युरोपला जाणार आहे. पण युरोपच्या बाजारपेठेच्या बाबतींत जरा अडचणी आहेत. युरोपमधील लोकांना दक्षिण अमेरिकेंतील आणि वेस्ट इंडीज बेटांतील केळीं खाण्याची संवय झालेली आहे. अलीकडे पश्चिम आफ्रिकेंतूनहि युरोपला केळीं निर्यात होऊं लागलीं आहेत. युरोपमधील लोकांच्या रुचीला सरावलेल्या केळयाव्यतिरिक्त इतर केळीं तेथें खपतील किंवा नाहीं, हें सहज समजण्यासारखें नाहीं. त्यासाठी युरोपमधील ग्राहकांच्या आवडीनिवडींचा अभ्यास केला पाहिजे. भारतामध्यें निरनिराळ्या ६० प्रकारच्या केळ्यांची लागवड करण्यांत येते. ग्राहकांच्या आवडीनिवडींची दखल घेण्यांत आली तर कांहीं प्रकारचीं हिंदी केळीं युरोपमध्यें खपूं शकतील. परंतु त्यासाठी विशेष प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत.

---

### ब्रिटनमधील गोऱ्यांत वर्णद्वेषाची भावना

दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेंतील दक्षिणेकडील कांहीं घटक राज्यें ह्यामधील वर्णद्वेषाच्या वार्ता मधूनमधून येत असतात. परंतु कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील प्रमुख जें ब्रिटन, त्यामध्येंहि वर्णद्वेष अगदींच नाहीं असे नाहीं. लंडनपासून सुमारें १२ मैलांवर साऊथाल नांवाचा एक उद्योगधंद्यांत पुढारलेला भाग आहे. ह्या भागांत हिंदी, पाकिस्तानी. वेस्ट इंडिअन्स, ह्या कृष्णवर्ण लोकांची १२ हजारांच्या आसपास वस्ती आहे. ह्या लोकांच्यापैकी कांहीं लोक स्वतःचें घर घेण्याइतके सधन झालेले असूनहि त्यांना गोऱ्या लोकांच्या वस्तींत राहण्यासाठी घर विकत घेतां येत नाहीं. कारण, गोऱ्या लोकांची वस्ती असलेल्या भागांतील नागरीक काळ्या लोकांना आपल्या वस्तींत येऊं देण्यास तयार नाहींत. त्यांच्या ह्या वर्णद्वेषाच्या भावनेमुळें मालमत्तेची खरेदी–विक्री करणारे एजंटसहि ह्या बाबतींत कांहीं करूं शकत नाहींत. तरीहि हॅमवरो नांवाच्या एका विभागांत ६ हजार कृष्णवर्णीय लोकांनीं आपला प्रवेश करून घेतला आहे. ह्या भागांतील घरें जुनीं आहेत आणि त्यांपैकीं कांहीं काळ्या लोकांनीं बेताच्या किंमतींना विकत घेतलेलीं आहेत. परदेशांतून येऊन स्थायिक झालेल्या ह्या लोकांनीं आपल्या तक्रारी स्थानिक स्वराज्यसंस्थांना सादर केलेल्या आहेत. ह्या संस्थांतून मजूरपक्ष अधिकारावर असल्यानें तक्रारींची दाद लवकर लागेल असा विश्वास त्यांना वाटत आहे. ब्रिटनमधील वर्णद्वेषाची भावना ब्रिटनच्या साम्राज्यांत पूर्वीं असलेल्या वसाहतींत नोकरी करून निवृत्त झालेल्या नोकरांत विशेष आढळून येते. ह्या लोकांना काळ्या आदमींत कांहीं चांगलें दिसतच नाहीं. ह्या गटांत मोडणाऱ्या गोऱ्या लोकांनीं आपसांत एक प्रकारचा गुप्त करारच केल्याचें दिसून येतें. चांगली किंमत आली तरी काळ्यांना घरें विकण्याची त्यांची तयारीच नसते.

---

अर्थ

बुधवार, ४ सप्टेंबर, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी खटपट

हिंदमधील साखरेचें उत्पादन वाढविण्याच्या हेतूनें भारत सरकारनें ह्या वर्षीच्या उसाच्या गाळणीचा हंगाम लवकर सुरू करण्याच्या सूचना साखर कारखान्यांना दिल्या आहेत. साखरेच्या उत्पादनांत गेल्या हंगामांत घट झाल्यानें देशांतर्गत खपासाठी व निर्यातीसाठी आवश्यक तितकी साखर मिळूं शकली नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील साखरेचे कारखाने आपला हंगाम ह्या वर्षी ऑक्टोबरच्या मध्यापासून सुरू करतील असा अंदाज आहे. दक्षिण भारतांत उसाचें पीक लवकर पक्व होतें. त्यामुळें तेथील कारखाने पुढील महिन्याच्या प्रारंभीं चालू होण्याची शक्यता आहे. तथापि साखरेच्या उत्पादनाशीं व व्यापाराशीं संबंधित असलेल्या लोकांच्या मतानें साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी सरकारनें योजलेल्या उपायांना म्हणावें तितकें यश येणार नाहीं. उसाचा शेतकरी पीक पक्व झाल्याशिवाय त्याची तोडणी करण्यास तयार होणार नाहीं. अपक्व उसाचें गळीत जरी सुरू करण्यांत आलें तरी त्यापासून होणारा साखरेचा उतारा कमी असणार आणि त्यामुळें साखरेचें उत्पादनहि कमीच होणार. गेल्या कांहीं वर्षांत पुष्कळशा कारखान्यांना गळितासाठीं लागणारा ऊंस पुरेशा प्रमाणांत मिळाला नाहीं. त्याचें कारण असें कीं, उसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत वाजवी प्रमाणांत वाढ झालेली नाहीं. अशा परिस्थितींत साखरेचे कारखाने लवकर सुरू करण्यांत आले तर ते लवकर बंदहि करावे लागण्याचा संभव आहे. उसाचें पीक दीर्घ कालावधीचें असल्यानें त्याची लागवड एकदम वाढवितां येणें शक्य नसतें. त्यांतच लागवडीच्या चालू हंगामांत उसाच्या मळेवाल्यांना पुरेसें बेणें पुरविण्यांत आलें नाहीं, अशा वार्ता आहेत. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करतां तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील साखरेचें दुरुस्त उद्दिष्ट गांठतां येणें अवघड वाटत आहे. हें उद्दिष्ट ३५ लाख टनांऐवजीं ४० लाख करण्यांत आलें आहे.

## केळ्यांची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न

निर्यात व्यापार वाढविण्याची भारताची गरज अलीकडे अधिक तीव्र झालेली आहे. कारण आतां नेहमींच्या विकास कार्याबरोबर चिनी आक्रमणामुळें परदेशीय चलनांत कराव्या लागणाऱ्या खर्चांत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे म्हणून अनेक प्रकारच्या नव्या मालाची नवनव्या बाजारपेठांत निर्यात करण्याचे प्रयत्न जारीनें करण्यांत येत आहेत. गेल्या वर्षी रशियाला भारतामधील केळीं निर्माण करण्याच्या दृष्टीनें विचार चालू होता. हिंदमधील केळीं रशिआला निर्यात करण्याच्या मार्गातील पहिली अडचण म्हणजे हीं केळीं टिकण्याची; पण आतां ही अडचण दूर झाली आहे. केळीं टिकण्यासारखें योग्य तपमान ज्या बोटींत राखतां येईल अशा प्रकारच्या बोटी निर्यातीसाठी वापरण्यांत येणार आहेत. त्यामुळें रशिआनें भारताकडून ४ हजार टन केळीं घेण्याचा करार केला आहे. हिंदी केळ्यांना पश्चिम आशीआंतील कांहीं देशांचीहि चांगली मागणी आहे. कुवेतच्या राज्यांत नुकतीच ५ हजार टन केळीं पाठविण्यांत आलीं. युरोपांतील देशांना हिंदमधील केळीं निर्यात करतां येतील काय हें पाहण्यासाठी एक प्रतिनिधिमंडळ युरोपला जाणार आहे. पण युरोपच्या बाजारपेठेच्या बाबतींत जरा अडचणी आहेत. युरोपमधील लोकांना दक्षिण अमेरिकेंतील आणि वेस्ट इंडीज बेटांतील केळीं खाण्याची संवय झालेली आहे. अलीकडे पश्चिम आफ्रिकेंतूनहि युरोपला केळीं निर्यात होऊं लागलीं आहेत. युरोपमधील लोकांच्या रुचीला सरावलेल्या केळ्याव्यतिरिक्त इतर केळीं तेथें खपतील किंवा नाहीं, हें सहज समजण्यासारखें नाहीं. त्यासाठी युरोपमधील ग्राहकांच्या आवडीनिवडींचा अभ्यास केला पाहिजे. भारतामध्यें निरनिराळ्या ६० प्रकारच्या केळ्यांची लागवड करण्यांत येते. ग्राहकांच्या आवडीनिवडींची दखल घेण्यांत आली तर कांहीं प्रकारचीं हिंदी केळीं युरोपमध्यें खपूं शकतील. परंतु त्यासाठी विशेष प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत.

## ब्रिटनमधील गोऱ्यांत वर्णद्वेषाची भावना

दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेंतील दक्षिणेकडील कांहीं घटक राज्यें ह्यामधील वर्णद्वेषाच्या वार्ता मधूनमधून येत असतात. परंतु कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील प्रमुख जें ब्रिटन, त्यामध्येंहि वर्णद्वेष अगदींच नाहीं असें नाहीं. लंडनपासून सुमारें १२ मैलांवर साऊथाल नांवाचा एक उद्योगधंद्यांत पुढारलेला भाग आहे. ह्या भागांत हिंदी, पाकिस्तानी, वेस्ट इंडिअन्स, ह्या कृष्णवर्ण लोकांची १२ हजारांच्या आसपास वस्ती आहे. ह्या लोकांच्यापैकी कांहीं लोक स्वतःचें घर घेण्याइतके सधन झालेले असूनहि त्यांना गोऱ्या लोकांच्या वस्तींत राहण्यासाठी घर विकत घेतां येत नाहीं. कारण, गोऱ्या लोकांची वस्ती असलेल्या भागांतील नागरीक काळ्या लोकांना आपल्या वस्तींत येऊं देण्यास तयार नाहींत. त्यांच्या ह्या वर्णद्वेषाच्या भावनेमुळें मालमत्तेची खरेदी–विक्री करणारे एजंटसहि ह्या बाबतींत कांहीं करूं शकत नाहींत. तरीहि हॅमबरो नांवाच्या एका विभागांत ६ हजार कृष्णवर्णीय लोकांनीं आपला प्रवेश करून घेतला आहे. ह्या भागांतील घरें जुनीं आहेत आणि त्यांपैकीं कांहीं काळ्या लोकांनीं बेताच्या किंमतींना विकत घेतलेलीं आहेत. परदेशांतून येऊन स्थायिक झालेल्या ह्या लोकांनीं आपल्या तक्रारी स्थानिक स्वराज्यसंस्थांना सादर केलेल्या आहेत. ह्या संस्थांतून मजूरपक्ष अधिकारावर असल्यानें तक्रारींची दाद लवकर लागेल असा विश्वास त्यांना वाटत आहे. ब्रिटनमधील वर्णद्वेषाची भावना ब्रिटनच्या साम्राज्यांत पूर्वी असलेल्या वसाहतींत नोकरी करून निवृत्त झालेल्या नोकरांत विशेष आढळून येते. ह्या लोकांना काळ्या आदमींत कांहीं चांगलें दिसतच नाहीं. ह्या गटांत मोडणाऱ्या गोऱ्या लोकांनीं आपसांत एक प्रकारचा गुप्त करारच केल्याचें दिसून येतें. चांगली किंमत आली तरी काळ्यांना घरें विकण्याची त्यांची तयारीच नसते.

## पाकशास्त्राची महति मुलींनीं पटवून द्यावी

लग्नाच्या बाजारांत उभ्या राहाणाऱ्या मुलींना पाकशास्त्राची महती पटवून देण्यासाठी श्रीमती हेलेन गोजेन ह्या नांवाच्या एका कॅनेडिअन बाईनीं प्रयत्न चालविला आहे. पाकशास्त्रावर त्यांनीं बरींच पुस्तकें लिहिलीं असून त्यांचें स्वागतहि चांगलें झालेलें आहे. स्त्रियांना पाकशास्त्राची शिकवण देण्याची वास्तविक जरूर पडूं नये; पण अलीकडे उद्योगप्रधान देशांतून घरीं स्वयंपाक करण्याची पद्धतच लुप्त होऊं पहात आहे. अमेरिकेसारख्या सुसमृद्ध देशांत तर डबाबंद शिजविलेले अन्नपदार्थ वाटेल तेव्हां आणि वाटेल त्या प्रकारचे मिळूं शकतात. त्यामुळें गृहिणींना पाकनिर्मितीचें काम पंधरावीस मिनिटांपेक्षा जास्त करावेंच लागत नाहीं. श्रीमती गोजेन ह्यांच्या मतानें पाकशास्त्रांत तरबेज असणाऱ्या तरुणीला मनासारखा पति मिळणें सोपें जातें. ज्या माता आपल्या मुलींना स्वयंपाकघरांत लक्ष घालण्यास सांगत नाहींत त्या मोठी चूक करीत आहेत. ह्या प्रश्नाच्या व्यावहारिक बाजूकडेहि त्यांनीं लक्ष दिलेलें आहे. ब्रिटन, अमेरिका, इत्यादी पाश्चात्य देशांतून नोकर मिळणें ही गोष्ट फार अवघड झालेली आहे. ब्रिटनमध्यें तर आपलीं सर्व कामें आपणच करण्याची निकड लोकांना चांगलीच कळलेली आहे. कॅनडांतहि आतां नोकर मिळणें दुरापास्त होत चाललें आहे. भारतांत अजूनहि घरकामाला नोकर मिळूं शकतात. तरीसुद्धां गेल्या कांहीं वर्षांत नोकर ठेवणाऱ्या मालकांनाच त्यांच्या कलानें घेण्याचे दिवस आलेले आहेत. अशा परिस्थितींतहि हिंदमधील वरिष्ठ वर्गांतील कित्येक तरुणींना आपणास स्वयंपाक येत नसल्याचा अभिमान वाटतो असें दिसून येतें. पतीवर प्रेमाची हुकमत चालविण्याची इच्छा सर्वच विवाहित स्त्रियांना कमीअधिक प्रमाणांत असते. ती पुरी करण्याचें एक महत्त्वाचें साधन म्हणजे चांगलें अन्न करून घालण्याची किमया, अशी श्रीमती गोजेन ह्यांची सूचना आहे.

## परदेशी चित्रपटांची आयात

भारतांत आयात करण्यांत येणाऱ्या परदेशीय चित्रपटांसंबंधीं राज्यसभेंत आंतरराष्ट्रीय व्यापारखात्याच्या मंत्र्यांनीं माहिती दिली. अमेरिकेच्या मोशन पिक्चर्स एक्सपोर्ट असोसिएशन ह्या संघटनेच्या आणि रँक फिल्म डिस्ट्रिब्यूटर्स ऑफ इंडिया लि. ह्या कंपनीच्या मार्फत परदेशी चित्रपटांची आयात करण्यांत येते. परदेशी चित्रपट भारतांत दाखवून जें उत्पन्न कायद्याप्रमाणें परदेशीं पाठवितां येतें, त्यांपैकी पहिल्या संस्थेमार्फत दर सहा महिन्याला १० लाख रुपये परदेशीं पाठविता येतात. दुसऱ्या संस्थेमार्फत दर सहा महिन्याला ५० हजार रुपये पाठविता येतात. उरलेल्या उत्पन्नाचा भाग भारतांतच खात्यांत जमा करण्यांत येतो. ह्या खात्यांतील रकमेचा उपयोग भारतीय चित्रपटांची परदेशी निर्यात वाढविण्यासाठी अगर हिंदी चित्रपटांची निर्मिति करण्यासाठी करण्यांत येतो.

## लोकरीच्या धंद्याचें शिक्षण

जोधपूर येथें लोकर कापण्याचें व तिच्या प्रती ठरविण्याचें शिक्षण देणारी एक शाळा उघडण्यांत आली आहे. अशा प्रकारची भारतामधील ही पहिलीच शाळा असून ती स्थापन करण्याच्या कामीं ऑस्ट्रेलिआंतील तज्ज्ञांचें मार्गदर्शन घेण्यांत आलें आहे. लोकरीला बाजारपेठ कशी मिळवावी ह्यासंबंधीं शाळेंत शिक्षण देण्यांत येणार आहे. आपल्या लष्कराच्या गरजा चांगल्या रीतीनें भागविण्याचें काम ही शाळा करूं शकेल.

## तंग पोषाख केलेल्या तरुणींवर राग

वयांत आलेल्या तरुणतरुणींनीं अंगाबरोबर घट्ट बसणारे कपडे करू नयेत अशी सूचना पाकिस्तान सरकारनें दिलेली आहे. ह्या सूचनेला मुल्लामौलवींचा अर्थातच पाठिंबा आहे. पण, डाक्क्यांतील दोघा तरुणींनीं अशा प्रकारचा पोषाख करून रात्रीं फेरफटका करण्याचें ठरविलें. तरुणींनीं केलेला घट्ट सलवार-खमीझचा पोषाख शहरांतील लोकांना न आवडून त्यांनीं तरुणींची टिंगल व टर उडविण्यास प्रारंभ केला. त्यांच्या मतानें असा पोषाख करणें मुसलमानी धर्माच्या विरुद्ध वर्तन आहे. अखेर ह्या तरुणींचें संरक्षण करण्यासाठी २४ पोलिसांना त्यांच्याभोंवतीं कडे करावें लागलें. तरीसुद्धां लोकांच्या घोळक्यानें पोलिसांवर दगडफेक करून त्यांना गंभीर स्वरूपाच्या जखमा केल्या. सदर तरुणींना आपल्या ताब्यांत द्यावें असें जमावाचें म्हणणें होतें. असेच प्रकार कराची व लाहोर शहरांत झाल्यामुळें बेताल पोषाख करणारे तरुण व तरुणी जरा संयमानें वागूं लागल्या आहेत.

## अणुस्फोट चांचणी-बंदी युद्धास अनुकूल

अमेरिकेच्या सिनेट फॉरिन रिलेशन्स कमिटीपुढें साक्ष देतांना हैड्रोजन बॉंबचे जनक डॉ. एडवर्ड टेलर ह्यांनीं असें सांगितलें कीं, मॉस्कोमधील अणुस्फोट चांचणी-बंदी करार युद्धास अनुकूल आहे. त्यांच्या मतानें, रशिआनें अग्निबाणांचा आकाशांतच निकाल लावणारें अस्त्र शोधून काढण्याच्या कामीं खूपच प्रगति केली असून अमेरिका त्या बाबतींत मागें आहे. पण, कांहीं तज्ज्ञांच्या मतानें अग्निबाणांचा नाश करणारें अस्त्र शोधून काढण्याच्या कामीं रशिआ व अमेरिका ह्या दोघांनाहि यश आलेलें नाहीं व येण्याची शक्यता नाहीं. त्यामुळें आणि सर्व अग्निबाणांचा वरच्यावर नाश करणें अशक्य असल्यानेंच उभयतां देशांनीं मॉस्कोंतील बंदी करारावर सह्या केल्या.

## परदेशांनीं दिलेली मदत वापरली नाहीं

इंडिअन मर्चंटस् चेंबर ह्या संघटनेचे चिटणीस श्री. धीवाला मुंबई उपनगर रोटरी क्लबमध्यें भाषण करतांना म्हणाले कीं परदेशांनीं भारताला दिलेल्या आर्थिक मदतीपैकी ७० टक्के मदत चालू वर्षाच्या आरंभापर्यंत वापरली गेलेली नव्हती. ज्या विकासाच्या कार्यक्रमांना परदेशीय चलनाची गरज आहे, त्या कार्यक्रमांची अंमलबजावणी वेळापत्रकाप्रमाणें करण्यांत आली पाहिजे. विलंबामुळें परदेशीय मदत वापरली गेली नाहीं असें होतां कामा नये. भारतामधील उद्योगधंद्यांची कार्यक्षमता कमी प्रतीची आहे. त्याला कच्च्या मालाची, औद्योगिक शेतीची व वहातुकीच्या साधनांची टंचाई मुख्यतः जबाबदार आहेत. उद्योगधंद्यांच्या उत्पादनक्षमतेपैकी ३२ ते ८० टक्के क्षमता वापरली जात नाहीं. भारताच्या अर्थव्यवस्थेंत कांहीं प्रश्न नव्यानें निर्माण होत आहेत. सरकारनें व्यवहार्य दृष्टिकोण स्वीकारला तरच त्यांची सोडवणूक होईल.

## पलाई बँकेच्या ठेवीदारांना ४६० लक्ष रु. मिळाले

पलाई सेंट्रल बँकेच्या ठेवीदारांना लिक्विडेटरनें ३० जून, १९६३ अखेर एकूण ४६० लक्ष, २४ हजार रुपये वाटले आहेत. त्या तारखेपर्यंतचा लिक्विडेशनचा खर्च १३ लक्ष, १४ हजार रुपये झाला आहे.

## थकबाकीमुळें होणारी राष्ट्रीय हानि

### सहकारी रजिस्ट्रार, श्री. बोंगीरवार यांचा इशारा

"आतांच एका तालुक्यांतील चेअरमनशीं बोलतांना त्यानें आपला अनुभव सांगितला. छोटे कर्जदार पैसे वेळेवर देतात. पण मोठेच अडवितात. हे मोठे लोक व्यासपीठावरून मोठ्या गोष्टी मात्र बोलतात. या बाबतींत नवीन कायदा झाला आहे. त्यान्वयें कोणत्याहि थकबाकीदाराला पदाधिकारी राहातां येत नाहीं. गांवांत थकबाकीदार राहून साखर कारखान्याचे डायरेक्टर होतां येणार नाहीं. तेल गिरणींत पदाधिकारी होतां येणार नाहीं. आज तिन्ही जिल्ह्यांच्या मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन इथें आहेत. त्यांना मी सांगूं इच्छितों. थकबाकीदाराच्या सहीचा चेक वटू देऊं नका. केलात तर ती तुमची वैयक्तिक जबाबदारी राहील.

"महाराष्ट्रांतील सहकारी चळवळ भारतांत पहिल्या क्रमांकाची आहे. आपल्या या ३ जिल्ह्यांत ९॥ कोटी रुपयांचें कर्ज वांटप झालें आहे. हा कर्जाचा व्यवहार बंगाल, बिहार व ओरिसा या ३ प्रांतांच्यापेक्षा जास्त आहे. इतकेंच नव्हे तर त्यांच्याहून चांगला आहे. महाराष्ट्राचे ३ऱ्या पंचवार्षिक योजनेंत १०० कोटींचें लक्ष्य आहे. त्यांपैकी ५२ कोटींचें काम पुरें झालें आहे. १॥ वर्षांत हें लक्ष्य गांठावयाचें आहे. कर्जाच्या व्यवहाराचें प्रमाण वाढलें पाहिजे. या व्यवहाराचा खरा फायदा गरीब, गरजू शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. पण तो मिळत नाहीं. त्यांत अडचणी आहेत. हा कर्जव्यवहार गांवांतील संस्थेमार्फत चालतो. तिथें कार्यक्षम अधिकारी नसले तर फार अडचण होते. अनेक ठिकाणीं, पंचकमिटीचे सदस्य शक्य असून कर्ज परत करीत नाहींत. त्यामुळें गरीब शेतकऱ्यांची अडचण होते. या रोगाची सुरुवात आपल्याकडे होऊं लागली आहे. बिहार, आसाम या प्रांतांत हा पैसा परत करायचा नाहीं असें समजून लोकांनीं परत केला नाहीं म्हणून एका बिहार प्रांतांत २२ कोटी थकबाकी आहे.

"थकबाकीच्या बाबतींत सोसायटीच्या घरावर चेअरमन व सेक्रेटरी यांनीं कडक राहावें. थकबाकींत शेअर भांडवल अडकतें. दिलेला पैसा परत आणण्यासाठी डोळ्यांत तेल घालून असलें पाहिजे. वसुली झाली नाहीं तर यंत्रणा कोसळेल. पैसा फिरला पाहिजे.यापुढें थकबाकीदारांचीं नांवें आम्ही वर्तमानपत्रांतून जाहीर करणार आहोंत.

"शेतीच्या उन्नतीसाठी सहकारी चळवळीशिवाय मार्ग नाहीं म्हणून गांवांतील सहकारी संस्था चांगली चालविली पाहिजे. कारण नसतांना थकबाकी ठेवणें हें महापाप आहे. त्यामुळें संस्थेला धोका आहे ही भावना प्रत्येक सभासदाच्या मनांत असली पाहिजे. थकबाकी वाढली तर नवीन कर्जदार वाढणार नाहींत. नवीन शेतीचें उत्पादन वाढणार नाहीं व त्यामुळें देशाचें नुकसान होईल. हें समजून सांगणें हा या समारंभाचा हेतु आहे.":— महाराष्ट्र राज्याच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री एस्. एन्. बोंगीरवार यांनीं सांगली, सातारा व कोल्हापूर या ३ जिल्ह्यांतील १०० टक्के कर्ज वसुली करणाऱ्या सोसायट्यांच्या व त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या गौरवसमारंभप्रसंगीं अध्यक्ष म्हणून बोलतांना काढलेले उद्गार.

---

### दि पूना मर्चंटस् को. बँक लि.

५,००० भागांचें अधिकृत भांडवल ह्या सहकारी वर्षांत जवळ जवळ संपलेंच आहे. केवळ ३० भाग शिल्लक आहेत. पूना म्युनिसिपल कॉर्पोरेशन आणि चॅरिटेबल ट्रस्टसकडून ठेवी स्वीकारण्यास सहकारी खात्याची मान्यता आली आहे. बँकेकडे आतां १७½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेस १९,७४५ रु. नफा झाला. ४% डिव्हिडंड देण्यांत येणार आहे.

## भारतीयांचा दर माणशीं खर्च

### राष्ट्रीय उत्पन्नांतील वाढीचा फायदा फक्त कांहीं असामींनाच मिळाला आहे काय?

मध्यवर्ती सरकारचे नियोजन मंत्री, श्री. गुलझारीलाल नंदा, ह्यांनीं भारतीयांच्या दरमाणशीं दररोजच्या सरासरी खर्चाचा तपशील लोकसभेला सादर केला :—

| लोकसंख्येची टक्केवारी% | दर माणशीं, दर दिवशीं होणारा सरासरी खर्च ( नवे पैसे ) ( १ आणा = ६·२५ न. पै. ) | |
|---|---|---|
| | खेडेगांवांत | शहरांत |
| ०–५ | २४ | २८ |
| ५–१० | २७ | ३२ |
| १०–२० | ३१ | ४० |
| २०–३० | ३५ | ४५ |
| ३०–४० | ३९ | ५० |
| ४०–५० | ४२ | ५५ |
| ५०–६० | ४५ | ६० |
| ६०–७० | ४९ | ६४ |
| ७०–८० | ५५ | ७१ |
| ८०–९० | ५८ | ८० |
| ९०–१०० | ७० | १०१ |

वरील तक्त्याप्रमाणें, दरमाणशीं दररोजचा सरासरी खर्च खेडेगांवांत ७० न. पैसे आणि शहरांत १०१ न. पैसे होतो, असें दिसून येईल. सप्टेंबर, १९६१ ते ऑगस्ट, १९६२ ह्या मुदतीमधील खर्चाच्या आंकड्यांचा हा तपशील नॅशनल सॅपल सर्व्हेच्या आधारानें करण्यांत आलेला आहे. घरगुती गरजांसाठी केलेला खर्च त्यांत अंतर्भूत आहे. घरीं पिकविलेलें धान्य, ऐनजिनसी विनिमयानें मिळविलेले पदार्थ, देणग्या, कर्ज, इत्यादींचा त्यांत समावेश होतो.

वाढत्या खर्चाच्या अनुरोधानें लोकसंख्येचे गट करण्यांत आलेले आहेत. उदाहरणार्थ, ०–१०% ह्या गटांत कमींत कमी खर्चाच्या जनतेचा समावेश आहे, तर ९०–१००% ह्या गटांत सर्वांत जास्त खर्चाच्या १०% जनतेचा समावेश आहे.

डॉ. राम मनोहर लोहिया ह्यांनीं लोकसभेंत आचार्य कृपलानी ह्यांच्या सरकारवरील अविश्वासाच्या ठरावावरील भाषणांत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा उल्लेख केला होता आणि वाढलेलें उत्पन्न फक्त कांहीं थोड्यांना श्रीमंत करण्यास कारणीभूत झालें असून बहुसंख्य लोकांचें दारिद्र्य कायम आहे, अशी टीका केली होती. "देशांतील २७ कोटी लोक दररोज सरासरी तीन आण्यांवर आपली गुजराण करीत आहेत, तर उद्योगपतींच्या एकेका कुटुंबाची रोजची मिळकत ३ लक्ष रुपये आहे" असें ते म्हणाले होते. त्याला उत्तर म्हणून श्री. नंदा ह्यांनीं वरीलप्रमाणें आंकडे मांडले आहेत. त्याला प्रत्युत्तर देतांना डॉ. लोहियांनीं आपल्या पूर्वीच्याच म्हणण्याचें समर्थन केलें आहे. "तीन आण्यांचा हिशोब बरोबर कां चूक हा प्रश्न नसून, खरी आंकडेवारी लपवून समृद्धीचा आभास निर्माण केला जात आहे, हा आहे" असें ते म्हणाले.

### एरोनॉटिक्स इंडिया लि.

मिग प्रकारच्या स्वनातीत व इतर प्रकारच्या विमानांचें उत्पादन करण्यासाठी २५ कोटी रुपये भांडवलाची एक सरकारी मालकीची कंपनी स्थापन करण्यांत आली आहे. एरोनॉटिक्स इंडिया लि. हें तिचें नांव असून ती विमानांचे सांगाडे, इंजिनें आणि इतर भाग यांच्या निर्मितीचें काम करणाऱ्या कारखान्यांची व्यवस्था पाहील.

### आफ्रिकेंतील देशांकडे होणाऱ्या इंजिनिअरिंग मालाच्या निर्यातींत वाढ

आफ्रिकेंतील देशांकडे भारतांतू • होणाऱ्या इंजिनिअरिंग मालाच्या निर्यातींत वाढ झाली आहे. जानेवारी–मे १९६३ या काळांत भारतांतून त्या देशांकडे ८८,४९,७७२ रु. किंमतीचा इंजिनिअरिंग माल निर्यात झाला. गेल्या वर्षाच्या याच काळांत ७८,१९,१७१ रु. किंमतीचा इंजिनिअरिंग माल निर्यात झाला होता. मे १९६३ मध्यें १९,६२,१२१ तर मे १९६२ मध्यें १३,४७,३७० रुपये किंमतीचा इंजिनिअरिंग माल भारतांतून ह्या देशांकडे निर्यात झाला.

### करांच्या आणि जकातीच्या उत्पन्नांत वाढ

मध्यवर्ती सरकारला करांच्या आणि जकातीच्या उत्पन्नापासून १९६३-६४ च्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत एकूण २९७·७५ कोटी रुपये उत्पन्न मिळालें. यांपैकी १०५·९६ कोटी रुपये जून १९६३ मध्यें मिळालें. १९६२-६३ च्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत २३०·२१ तर जून १९६२ मध्यें ८६·४४ कोटी रुपये उत्पन्न मध्यवर्ती अबकारी करांपासून मिळालें होतें.

### धातूंना चढणाऱ्या गंजामुळें १८० कोटी रु. ची खोट

निरनिराळ्या धातूंना चढणाऱ्या गंजामुळें भारताला दरसाल सुमारें १८० कोटी रुपयांची खोट बसते आणि धातु व धातूंच्या वस्तूंचा बराच मोठा वापर संरक्षण विभागातर्फे होत असल्यामुळें यांपैकी बराच मोठा तोटा त्या खात्याला सोसावा लागतो. धातूंना गंज चढणार नाहीं यासाठी उपाय योजून त्यामुळें होणारें नुकसान कसें थांबवितां येईल याबाबत विचार करण्यासाठी संरक्षण-खात्याच्या संशोधन आणि विकास विभागातर्फे एक गंजविरोधी राष्ट्रकुल परिसंवाद १९६४ च्या प्रारंभीं आयोजित करण्यांत येणार आहे. हा परिसंवाद राष्ट्रकुल संरक्षण शास्त्र समिति लंडनच्या विद्यमानें भरविला जाणार आहे. कानपूर येथील संरक्षण संशोधन प्रयोगशाळेमध्यें गंजापासून धातूंचें संरक्षण करण्याबाबत बरीच प्रगति झालेली आहे.

### सौराष्ट्रांतील शहरांना पाण्याची टंचाई

सौराष्ट्रामधील राजकोट, जामनगर आणि जुनागड ह्या शहरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई सहन करावी लागणार अशीं चिन्हें दिसत आहेत. राजकोटच्या आसपास आतांपर्यंत फक्त १० इंच पाऊस झाला असून शहराला पाणी पुरवणाऱ्या तलावांतील पाण्याची उंची ह्या दिवसांत २१ फूट असावयास पाहिजे ती अवघी १४ फूट आहे. सौराष्ट्रांत उरलेल्या पावसाळ्यांत पाऊस कमी पडल्यास ह्या शहरांतील पिण्याचें पाणी शिधापद्धतीनें वाटावें लागेल.

### सरकारी छापखान्यांच्या कार्यशक्तींत ४० टक्के वाढ

भारत सरकारच्या छापखान्यांची कार्यशक्ति सुमारें ४० टक्क्यांनीं वाढविण्यांत येणार आहे. ही वाढ तिसऱ्या योजनेच्या उरलेल्या काळांत साध्य करण्यांत येईल व त्यामुळें त्या छापखान्यांत सध्यां ९ लक्ष पृष्ठांचा मजकूर छापतां येण्याची सोय आहे तींत वाढ होऊन १२·६ लक्ष पृष्ठांवर मजकूर छापतां येईल. फॉर्मच्या छापाईतहि सुमारें ३००० टनांनीं वाढ होईल. दिल्ली येथें एक नवीन छापखाना उभारण्यांत यावयाचा असून तेथें संसदीय कामकाजाची छपाई होईल. याखेरीज कोईम्बतूर, कोराटटी (केरळ,) नवी दिल्ली येथें प्रत्येकी एक छापखाना उभारणें, कलकत्त्यांतील छापखाना दुसऱ्या जागीं नेणें आणि अलीगढ येथें एक वसाहत बांधणें, इत्यादि गोष्टींचा योजनेंत समावेश होतो.

### बँक निवडणुकीच्या निमित्तानें एक अभिनव स्पर्धा
### ('आझाद हिंद' चा उपक्रम)

नगर शहराला भूषण असलेल्या अर्बन बँकेच्या वार्षिक निवडणुकीच्या निमित्तानें उभ्या राहिलेल्या उमेदवारांची १५० शब्दांत जो कोणी उत्कृष्ट व्यक्तिचित्रें लिहील त्यास प्रत्येक उमेदवारामागें एक रुपया बक्षीस मिळेल. स्पर्धेत उमेदवारांचे नातलगापासून तों मित्रांपर्यंत कोणीहि भाग घेऊं शकतो. लेख कागदाच्या एका बाजूनें लिहिलेला असावा. लेखांत व्यक्तीनें केलेलें कार्य, त्याचा स्वभाव व वागणूक यांची माहिती असावी. त्यांत निवडणुकीचा प्रचार नसावा. दि. १०–९–१९६३ पर्यंत आझादहिंद कार्यालयांत लेख आले पाहिजेत. बक्षिसास पात्र ठरलेलीं चरित्रें दिनांक २१ सप्टेंबरच्या आझादहिंदमध्यें प्रसिद्ध केलीं जातील आणि हीं बक्षिसें बँकेच्या निवडून आलेल्या नव्या चेअरमनच्या हस्तें समारंभपूर्वक बँकेच्या हॉलमध्यें दिलीं जातील.

### सर्दी पडशावरील औषधविरुद्ध मोहीम

अमेरिकेच्या अन्न व औषध खात्यानें सर्दीवर योजण्यांत येणाऱ्या कांहीं औषधांविरुद्ध मोहीम उघडली आहे. ज्या औषधांत जंतुनाशक द्रव्यांचा वापर केलेला असतो तेवढ्यापुरतीच ही मोहीम मर्यादित आहे. अमेरिकेंत घसा येणें, सर्दी होणें, इत्यादि किरकोळ तक्रारींवरसुद्धां अँटिबायोटिक आणि सल्फा या नांवानें माहीत असलेलीं औषधें वापरण्याची प्रथा पडलेली आहे. हीं औषधें मिळण्यासाठी डॉक्टरांची शिफारस लागत नाहीं. तीं कोठल्याहि केमिस्टांकडे सहज मिळूं शकतात. अशा प्रकारचीं ५० औषधें सध्यां अमेरिकेंत सरसहा विकलीं जातात. सहा तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानें, हीं औषधें सहज मिळण्यासारखीं असूं नयेत असें ठरविण्यांत आलें आहे. ह्याशिवाय आणखी ३० औषधांच्या बाबतींत रोग बरा करण्याची त्यांची शक्ति सिद्ध करण्याची सक्ति करण्यांत आली आहे. ही औषधें नेहमीं वापरल्यानें आणीबाणीच्या प्रसंगीं तीं रोग्यांना उपयोगीं पडत नाहींत असा अनुभव आहे.

### राजकोटजवळ सहकारी साखर कारखाना

राजकोटजवळील उना ह्या गांवच्या शेतकऱ्यांनीं सहकारी साखर कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. गांवाच्या आसपास सुमारें २००० एकरांत उसाची लागवड करण्यांत आलेली आहे. कारखान्यासाठी लागणारें भांडवल उभारण्याचा निर्णय घेण्यांत आला असून सरकारकडून कर्ज मिळण्याचे प्रयत्नहि करण्यांत येत आहेत. पालिटाना येथील शेतकरीहि सहकारी साखर कारखाना काढण्याच्या विचारांत आहेत.

दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

**कायम ठेव–**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेडयूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

**मुदत ठेवी**

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के,
४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा–विस्तार**

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.
रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.




ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
- धी क्राउन स्पिनिंग अ‍ॅण्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
- धी वेस्टर्न इंडिया स्पिनिंग अ‍ॅण्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड
- धी हिंदुस्तान स्पिनिंग अ‍ॅण्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड

TM-10C MAR

दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर-**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

**कायम ठेव-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | ३·२७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेडयूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.
टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:-युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू:-०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक:-३ टक्के

**मुदत ठेवी**

१ वर्ष-४¼ टक्के, २ वर्षे-४½ टक्के, ३ वर्षे-४¾ टक्के,
४ वर्षे-५ टक्के, ५ वर्षे-५½ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा-विस्तार**

शाखा-१. मुंबई-फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर-मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

दि. ३१-१२-१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.
रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.




ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
- धी क्राउन स्पिनिंग ॲन्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
- धी वेस्टर्न इंडिया स्पिनिंग ॲन्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड
- धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड.

### परदीप बंदराचा विकास

ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावरील परदीप बंदरांतील गाळ काढून त्याची खोली वाढविण्याचा करार ओरिसाचें सरकार आणि युगोस्लाव्हियांतील एक सरकारी कंपनी ह्यांच्यांत करण्यांत आला आहे. बंदराचा विकास करण्याच्या योजनेंतील हें एक महत्त्वाचें काम आहे. १९६५ अखेरपर्यंत बंदराच्या तळांतील २३ कोटी घनफूट गाळ उपसण्याचें काम पूर्ण करण्यांत येईल. परदीप हें खोल समुद्रावर वसलेलें बंदर असून त्याचा विकास पूर्ण झाल्यावर ६० हजार टन अशुद्ध लोखंड नेण्याइतक्या मोठ्या बोटी त्यांत नांगर टाकूं शकतील. ह्या बंदरांतून भारताकडून जपानला करण्यांत येणाऱ्या अशुद्ध लोखंडाची निर्यात होईल. पूर्व किनाऱ्यावरील हें एक मोठें बंदर होईल.

### कीनिआंतील समाजसुधारक संघटना

विवाहांतील हुंडापद्धतींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं कीनिआंत एक संघटना स्थापन करण्यांत आली आहे. कीनिआंत राहणाऱ्या आफ्रिकन टोळ्यांत वधू मिळविण्यासाठीं वराकडून हुंडा घेण्याची पद्धत आहे. हा हुंडा बहुधा गुरांच्या स्वरूपांत आणि कधीं कधीं अंशत: पैशाच्या रूपांत दिला घेतला जातो. गेल्या वर्षी कीनिआचे न्यायमंत्री मि. टॉम मोवाया विवाहबद्ध झाले. त्यांना आपल्या सासऱ्याला १२ गुरें द्यावीं लागलीं. वधूसाठी द्यावी लागणारी किंमत कमी करावी, घटस्फोटाची संख्या कमी करावी आणि वेश्याव्यवसाय बंद करावा म्हणून कीनिआंतील समाजसुधारक संघटना प्रयत्न करणार आहे.

### कॅन्सरवरील उपचारासाठी देणगी


कॅन्सरच्या रोगावर उपचार करण्यासाठी किरणोत्सर्जी कोबाल्टची देणगी ऑस्ट्रेलिआकडून भारताला मिळाली आहे. कोलंबो योजनेप्रमाणें देण्यात आलेल्या ह्या कोबाल्टची किंमत सुमारें ९० हजार रुपये आहे. अणुप्रभावित कोबाल्टची ही पेटी २ टन वजनाच्या शिशाची केलेली आहे. पेटींतील कोबाल्टचा गर्भ तीन चतुर्थांश इंच व्यासाचा आणि १ इंच लांब असा आहे. पण, त्याच्यापासून अतिशय शक्तिशाली असे गॅमा किरण स्फुरतात. म्हणूनच गर्भाला शिशाच्या जाड आवरणांत वेढून टाकावें लागतें. अशाच प्रकारची अणुप्रभावित कोबाल्टची पेटी १९६२ मध्यें ऑस्ट्रेलिआनें न्यूझीलंडला दिलेली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] गुलवाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३॥ "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "
मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
वसूल भांडवल रु. ९·८३ लाख
रिझर्व्ह व इतर फंडस् रु. ११·३३ "
ठेवी रु. ३५९·९२ "
खेळतें भांडवल रु. ३१४·५२ "
शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.